वसई विरार शहर महानगरपालिका

# ई -वार्ता

## महिला व बालकल्याण समितीस प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहिर

महाराष्ट् राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमधील उत्कृष्ट काम केलेल्या महिला व बालकल्याण समितीला पुरस्कार जाहिर करण्यात आले असून वसई विरार शहर महानगरपालिकेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट् महापौर परिषद, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपरिषदा महासंघ यांना सन 2013–14 मध्ये महानगरपालिका व नगरपरिषदांमधील ज्या महिला व बालकल्याण समिती उत्कृष्ट काम करतील त्यांना सन 2014–15 या वर्षी पासून पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला होता.

राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा यांचे कडून सन 2013–14 या वर्षात महिला व बालकल्याण समितीने गठीत केलेल्या कामासंबधी ठरावीक नमुन्यात माहिती मागविण्यात आली होती. त्यामध्ये निवड समितीने 4 बैठका घेउन पुरस्कार पात्र असणा–या महिला व बालकल्याण समितीची निवड केली असून यामध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

एकच लक्ष्य...
दोन कोटी वृक्ष

## वसई विरार शहर महानगरपालिका

# ई -वार्ता

## वृक्षरोपण सोहळा...





दि. 1 जुलै 2016 रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'एच' प्रभागामार्फत मा.महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर यांच्या हस्ते शालेय विद्यार्थी समवेत वृक्षरोपण करण्यात आले. त्याप्रसंगी माजी महापौर श्री. नारायण मानकर, परिवहन सभापती श्री. भरत गुप्ता, सभापती प्रकाश रॉड्रिक्स, नगरसेवक, नगरसेविका, महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

विरार (पश्चिम) म्हाडा कॉलनी येथे महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर व मा. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते वृक्षरोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमास म्हाडा विभागाचे प्रथम सचिव मा. श्री.श्रीकांत सिंह साहेब उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम म्हाडा विभाग मुंबईतर्फे आयोजित करण्यात आला होता.

वसुंधरेची एकच हाक – पर्यावरण रक्षणाचा घ्या ध्यास
झाडे लावा–झाडे जगवा आणि झाडे वाचवा.

वसई विरार शहर महानगरपालिका

ई -वार्ता

## नालासोपा–यात 37 वी परिवहन सेवा सुरु

वसई विरार शहर महानगरपालिकेने दि. 11 जुलै 2016 रोजी आमदार श्री. क्षितीज ठाकूर यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून नालासोपा–यात 37 वी परिवहन सेवा सुरु करण्यात आली.परिवहन समितीचे सदस्य अमीत वैद्य यांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या या परिवहन बस सेवेला मा.महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर यांनी हिरवा झेंडा दाखवला. सदर परिवहन बस सेवा आंबावाडी ते नालासोपारा स्टेशन व्हाया तुळींज आणि स्टेशन ते आंबावाडी व्हाया गालानगर, चंदन नाका अशी रिंग रुट सेवा महानगरपालिकेने सुरु केली.

तसेच परिवहन सेवेच्या या कार्यक्रमास उपमहापौर श्री. उमेश नाईक यांच्यासह परिवहन सभापती श्री. भरत गुप्ता, नगरसेवक श्री. रुपेश जाधव, नगरसेवक श्री. किसनमामा बंडागळे, श्री. राजु ढगे, नगरसेविका अनिता यादव, जया पेंढारी यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते.

वसई विरार शहर महानगरपालिका

ई -वार्ता

# शालेय डेंग्यू जनजागृती





दि. 11 जुलै पासून अतिसार नियंत्रण पंधरवडा हा कार्यक्रम राबविण्यात आला. त्या अनुषंगाने दूषित पाण्यापासून होणारे आजार, स्वच्छतेचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले व त्या पध्दतीने हात धुण्याविषयी माहिती देण्यात आली.

दि. 20 जुलै 2016 रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील नागरी आरोग्य केंद्र विरार (प) यांच्यातर्फे आदर्श विद्यालय, नारिंगी येथे आरोग्य विषयक माहितीपर कार्यक्रमांतर्गत पावसाळयात उदभवणारे आजार व प्रतिबंधात्मक उपाय यांची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. डासांमार्फत पसरणा–या डेंग्यू, मलेरीया अशा संसर्गजन्य आजारांबद्दल दूषित पाण्यापासून होणा–या अतिसार, काविळ अशा आजारांबद्दल माहितीपर प्रदर्शन देखील भरविण्यात आले होते. "डंख छोटा धोका मोठा" व "आला पावसाळा तब्येत सांभाळा" या विषयांवर शालेय विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धाही घेण्यात आली.

सदरील कार्यक्रमास नगरसेविका कांताताई पाटील उपस्थित होत्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी सर्वांनी कार्यक्रमासाठी उत्तम सहकार्य केले.





वसई विरार शहर महानगरपालिका

# ई -वार्ता

## सफाई कर्मचा-यांकरीता आरोग्य शिबीर

दिनांक 21 जुलै 2016 रोजी वसई विरार शहर महानगरपालिका व प्रभाग समिती (अ) सभापती माननीय श्री. पंकज ठाकूर व सर्व माननीय नगरसेवक यांच्या संयुक्त विद्यमानाने "स्वच्छ भारत अभियानांतर्गत" प्रभाग समिती (अ) मधील स्वच्छता व आरोग्य विभागातील कर्मचारी यांचा मैत्रीपूर्ण पंधरवडा कार्यक्रम नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बोळींज विरार (प) येथे आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाअंतर्गत माननीय महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर यांच्या हस्ते कर्मचा–यांना स्वच्छता साहित्य (गमबूट, ग्लोवज, मास्क) वाटप करण्यात आले. आपल्या भाषणात मा. महापौर यांनी सफाई कर्मचा–यांना दिलेल्या सहित्याचा वापर करुन आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. शहराची स्वच्छता तसेच आरोग्य राखत असल्याबददल त्यांचे आभार ही मानले.

स्वच्छता कर्मचा–यांशी मैत्रीपूर्ण वागणूक ठेवण्याचे आवाहन यावेळी महापौरांनी नागरिकांना केले. महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.परेश जाधव व डॉ.तृप्ती कोकाटे यांनी सफाई कर्मचा–यांची अरोग्य तपासणी केली. सफाई कर्मचा–यांसाठी माहापालिकेतर्फे प्रत्येक विभागीय कार्यालयात आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.







